# पोलीस अधीक्षक, कार्यालय गडचिरोली
## जनसंपर्क शाखा

P.R.O Office, Gadchiroli
**Phone No.** 07132223142 **Address**: SP Office,Gadchiroli
**E-mail** : prospoffice.gadchiroli@gmail.com


# वार्तापत्र

दिनांक १५/०६/२०१९

## वीर बाबुराव सेडमाके कृषी मेळाव्याचे आयोजन

=> शेतकऱ्यांच्या उत्पन्न वाढीसाठी गडचिरोली पोलीस दलाचा नाविण्यपुर्ण उपक्रम

गडचिरोली जिल्ह्यातील दुर्गम व अतिदुर्गम भागातील शेतकऱ्यांना आधुनिक शेती तंत्रज्ञान अवगत व्हावे आणि शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढावे याकरिता मा. पोलीस अधिक्षक, श्री. शैलेश बलकवडे सा़ो. यांच्या संकल्पनेतुन जिल्हाभरात कृषी विभागाचा सहभागातुन 'वीर बाबुराव सेडमाके कृषी मेळावे' भरवले जाणार आहेत.

सदर मेळाव्यामध्ये जिल्ह्यातील शेतकऱ्यांना येणाऱ्या धान लागवडी हंगामपुर्वी धान लागवडीच्या पध्दती व मशागतीच्या पध्दती, आधुनिक शेती तंत्रज्ञान, शेती मशागतीच्या विविध पध्दती, बी-बियाणे या विषयाची माहिती दिली जाणार आहे. त्याचबरोबर दुर्गम भागातील नागरिकांकरिता शासनाचा विविध योजना व उपलब्ध अनुदान यांची माहिती दिली जाणार आहे. तसेच शेतीक्षेत्राला पुरक असणारे जोडधंद्या विषयी मार्गदर्शन करण्यात येईल.

यापुर्वी उपविभाग अहेरी अंतर्गत येणाऱ्या पोमके पेरमीली चे प्रभारी अधिकारी यांनी त्यांच्या हद्दीतील नागरिकांना विश्वासात घेवुन त्यांना धान पिकाविषयी स्वत: फिल्डवर जावुन मार्गदर्शन केल्याने तेथील शेतकऱ्यांचे उत्पन्न भरघोस वाढल्याचे चित्र पाहायला मिळाले. याच प्रकारे जिल्ह्यातील इतर भागातील शेतकऱ्यांकरिता देखील विशेष कृषी मेळाव्यांचे आयोजन करण्यात येइल.

गडचिरोली जिल्हा हा धान उत्पादक जिल्हा म्हणुन ओळखला जातो. आगामी धान लागवडीच्या हंगामापुर्वी होणाऱ्या कृषी मेळाव्यांचा गडचिरोलीतील शेतकरी बांधवांना नक्कीच फायदा होइल. त्यामुळे जास्तीत जास्त संख्येने शेतकरी बांधवांनी या कृषी मेळाव्यात सहभागी व्हावे असे आवहन मा. पोलीस अधिक्षक, श्री. शैलेश बलकवडे सा़ो. यांनी केले.